सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-२०२५/प्र.क्र.२०/ E-office No.९१७९१९/कार्यासन -६,दि.०९/१२/२०२५

**विषय** :- केंद्र पुस्कृत योजनांतर्गत स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्याबाबतचे प्रस्ताव केंद्र शासनाला ऑनलाईन पाठविण्यासाठी गठीत करण्यात आलेली राज्यस्तरीय समिती रद्द करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-२०२५/प्र.क्र.२०/E-office No.९१७९१९/कार्यासन-६,दि.०९/१२/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२०९१५४३३३५८३५ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 10-12-2025 16:10:08

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्याबाबतचे प्रस्ताव केंद्र शासनाला ऑनलाईन पाठविण्यासाठी गठीत करण्यात आलेली राज्यस्तरीय समिती रद्द करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**दिव्यांग कल्याण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : दिव्यांग-२०२५/प्र.क्र.२०/E Office No.९१७९१९/कार्यासन-६**

**३१,३२,३५** ए, तिसरा मजला, ए-विंग, मित्तल टॉवर,

बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग,नरीमन पॉईंट,

मुंबई - ४०० ०२१.

दिनांक : ०९ डिसेंबर, २०२५

**वाचा :**

१) दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०२४/प्र.क्र.३२०/दिव्यांग कल्याण-२, दि. १२ मार्च, २०२५.

२) केंद्र शासनाच्या दीनदयाल दिव्यांग पुनर्वसन योजना (DDRS) बाबत दिनांक १ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या सुधारित मार्गदर्शक सूचना.

**प्रस्तावना:-**

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ३ व ४ एप्रिल, २०२५ रोजी पुणे येथे संपन्न झालेल्या महसूल परिषदेमध्ये दिलेल्या निदेशास अनुसरुन राज्य शासनाच्या धोरणात्मक योजनांमध्ये प्रत्यक्ष अनुभव व प्रतिक्रिया समाविष्ट करुन कार्यक्षम, परिणामकारक आणि लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्याच्या दृष्टीने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने विभागामार्फ़त गठीत करण्यात आलेल्या काही समित्यांचे पुनर्गठन, एकत्रीकरण अथवा समिती रद्द करण्याची शिफ़ारस करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, दिव्यांगजन सशक्तिकरण विभागामार्फत दिव्यांगांसाठी विविध कल्याणकारी योजना / कार्यक्रम राबविण्यात येतात. त्या योजनांतर्गत केंद्र शासनाकडून स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्यात येते. अशा योजनांचे प्राप्त झालेले प्रस्ताव नियमानुसार तपासून त्याबाबत पात्र संस्थांचे प्रस्ताव संदर्भ क्र.१ अन्वये गठीत केलेल्या समितीच्या शिफारशींसह केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात येतात.

तथापि केंद्र शासनाने दिनांक १ ऑक्टोबर, २०२४ रोजी दीनदयाल दिव्यांग पुनर्वसन योजना (DDRS) च्या सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनेमधील नियम १०.३ खालीलप्रमाणे आहे-

"The composition of the Committee will be at the discretion of the States/UTs which may bypass the process of forming grant-in-aid Committee/its recommendation or minutes **if the proposal has online recommendation of Chief Secretary / Principal Secretary / Spl. Secretary / Secretary of concerned State Ministry / Department / UTs.**"

केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत संस्थांचे अनुदान प्रस्ताव Online e-Anudaan Portal वर सादर केले जातात व मंजूर केले जातात. प्रस्ताव सादर करण्यापासून ते मंजुरी होऊन निधी वितरीत करण्याची सर्व प्रक्रिया online होत असल्याने प्रस्तावाची छाननी करण्यासाठी गठित समितीची उपयोगिता राहत नाही.

तसेच केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, दिव्यांगजन सशक्तिकरण विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ लवकरात लवकर लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी सदर प्रस्तावांची छाननी करुन केंद्र शासनास शिफारस करण्याबाबतच्या प्रक्रियेचे सुलभीकरण करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्ताव सादर करण्यासाठी किमान स्तर ठेवण्याचे निर्देश आहेत. तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशास अनुसरुन शासनाच्या धोरणात्मक योजनांमध्ये प्रत्यक्ष अनुभव व प्रतिक्रिया समाविष्ट करुन कार्यक्षम, परिणामकारक आणि लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्याच्या दृष्टीने सुलभीकरण करणे आवश्यक आहे. यास्तव प्रशासकीय प्रक्रियांचे सुलभीकरण(Ease of Doing Business) अंतर्गत केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्याबाबत प्राप्त प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक १२ मार्च, २०२५ अन्वये गठीत समिती रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, दिव्यांगजन सशक्तिकरण विभागामार्फत दिव्यांगांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्याचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यासाठी प्रशासकीय प्रक्रियांचे सुलभीकरण अंतर्गत शासन निर्णय, दिनांक १२ मार्च, २०२५ अन्वये गठीत करण्यात आलेली समिती सदर शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहे.

२. केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्याबाबतचे प्रस्ताव केंद्र शासनाला ऑनलाईन पाठविण्यासाठी सदर प्रस्तावांची अ.मु.स./प्रधान सचिव/ सचिव, दिव्यांग कल्याण यांचेस्तरावरुन छाननी करुन पात्र प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात येतील.

३. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१२०९१५४३३३५८३५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAIPRASAD DATTAGOUD MUKDADWAR

Digitally signed by SAIPRASAD DATTAGOUD MUKDADWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PERSONS WITH DISABILITIES WELFARE DEPARTMENT, 2.5.4.20=1fd0ba050afd8b541478dadd67654a462394d4b092aa83cf80dc3eb2722ef7f1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B36F2DE828CF58932F62F0A5F9320AC750FBA48646152A059F8C4D72B27812AB, cn=SAIPRASAD DATTAGOUD MUKDADWAR
Date: 2025.12.09 15:46:06 +05'30'

**( साईप्रसाद मुकदाडवार )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.,
३. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.,
४. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.,
५. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.,
६. मा. अध्यक्ष, विधानसभा, यांचे खाजगी सचिव, विधानभवन मुंबई.,
७. मा. मंत्री / राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.,
८. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/ विधानपरिषद), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.,
१०.अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.,
११.सचिव, दिव्यांग कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.,
१२.जिल्हाधिकारी (सर्व).,
१३.आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४.आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.,
१५.मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.,
१६.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).,
१७.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्या.,मुंबई.
१८. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व).,
१९.प्रादेशिक दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी (सर्व).,
२०.सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व).,
२१.जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),

२२.जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).,

२३.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र सी.डी.ओ. बॅरेक नं. १ योगक्षेम समोर, वसंतराव भगवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०.,

२४.इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय),समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२५.,

२५.राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई.,

२६.शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०० ००१.,

२७.बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१.,

२८. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमेटी, ३१४, राष्ट्रवादी भवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई.,

२९.भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब, मिल पॅलेस, वरळी, मुंबई.,

३०.महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०० ०२८.,

३१.निवड नस्ती/दिव्यांग कल्याण-३.